# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 07.10.2026** **वार : बुधवार**

## ठळक बातम्या

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील 25 वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त आज नवी दिल्लीतविकसित भारत संकल्प सभेचं आयोजन.
2. 'लघु आणि मध्यम उद्योगांसाठी 10 हजार कोटी रुपयांच्या विकास निधीच्या स्थापनेस केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता.
3. नवी दिल्लीत आजपासून 3 दिवसीय इंडिया मोबाइल कॉंग्रेसचं आयोजन.
4. 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेत पहिल्या सामन्यात भारताचा वेस्टइंडिजवर 8 गडी राखून विजय.

## सविस्तर बातम्या

**पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवासाची सुरुवात पंचवीस वर्षांपूर्वी 7 ऑक्टोबरपासून झाली होती. या निमित्तानं आज विकसित भारत संकल्प सभा आयोजित करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नीतिन नवीन या सभेला संबोधित करणार आहेत. या सभेत पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होणार आहेत.

**उपराष्ट्रपती राधाकृष्णन**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे, अभिनंदन केलं आहे. 'प्रधान सेवक' म्हणून मोदी यांच्या प्रवासाने 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या तत्त्वांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेला एका राष्ट्रव्यापी मोहिमेचे स्वरूप दिले आहे, असं राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**मंत्रिमंडळ-ठराव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील कारकिर्दीला 25 वर्षं पूर्ण झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा ठराव केंद्रीय मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत मंजूर झाल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. पंतप्रधान मोदी यांचा 25 वर्षांचा कार्यकाळ हा भारतीय लोकशाहीच्या सामर्थ्याचा पुरावा आहे, असं वैष्णव म्हणाले. जगात असे खूप कमी देश आहेत जिथे लोकांनी एकाच नेत्याला वारंवार आपला पाठिंबा दर्शविला आहे. हा पाठिंबा त्यांच्या कार्यपद्धतीमुळे, योग्य धोरणांमुळं, स्पष्ट आणि चांगल्या हेतूंमुळे मिळाला आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल 10 हजार कोटी रुपयांचा 'लघु आणि मध्यम उद्योग विकास निधी' अर्थात एसएमई निधी स्थापन करण्यास मंजुरी दिली. वाढीची क्षमता असलेल्यालघु आणि मध्यम उद्योगांमध्ये या निधीतून गुंतवणूक करण्यात येणार असल्याचं अश्विनी वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. तसंच केंद्रीय मंत्रिमंडळानं काल एकीकृत वाहतूक आणि लॉजिस्टिक प्राधिकरण स्थापन करण्यासही मंजुरी दिली. यामुळं परिवहन आणि मालवाहतूक क्षेत्रातील संशोधन, नियोजन, मूल्यमापन, देखरेख आदी प्रक्रिया

अधिक बळकट होतील. रस्ते, रेल्वे, बंदरं, हवाई वाहतूक, जलवाहतूक यासारख्या सर्व प्रकारच्या वाहतुकीच्या मार्गांसाठी दहा वर्षांचा आराखडा हे प्राधिकरण तयार करेल, असंही वैष्णव यांनी स्पष्ट केलं.

**<u>पीएम जीएसएम</u>**

नवी दिल्लीत आजपासून 3 दिवसीय इंडिया मोबाइल काँग्रेसचं आयोजन करण्यात आलं आहे. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'ग्लोबल सिस्टीम फॉर मोबाइल कम्युनिकेशन्स असोसिएशन'च्या अर्थात जीएसएमएच्या सदस्यांशी दिल्लीत संवाद साधला. तंत्रज्ञान हे सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचं साधन व्हावं, यावर त्यांनी भर दिला. तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण होण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला.

**<u>ईएफटीए</u>**

युरोपियन मुक्त व्यापार संघटना ईएफटीए आणि भारत यांच्यातल्या व्यापार आणि आर्थिक भागीदारी कराराच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलीन आज 'भारत मंडपम' इथं आयोजित 'दुसऱ्या भारत-ईएफटीएसमृद्धी शिखर परिषदे'ला संबोधित करणार आहेत. गेल्या वर्षी एक ऑक्टोबर रोजी हा करार अंमलात आला होता. या परिषदेत भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटनेचे सदस्य देश स्वित्झर्लंड, नॉर्वे,आइसलँड आणि लिंशेस्टाइनमधील वरिष्ठ सरकारी अधिकारी, उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार असून, 100 अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक भागीदारी उभारणे आणि भारतात 10 लाख रोजगार निर्माण करणे ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे.

यावेळी कराराच्या प्रगतीचा आढावा घेण्यासह नव्या गुंतवणुकीची घोषणा, उद्योग आणि सरकार यांच्यातील सहकार्य बळकट करणं, तसंच प्रमुख क्षेत्रांमधील संधी शोधण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे.

**<u>भारत-घाना करार</u>**

वैज्ञानिक संशोधन, शैक्षणिक क्षेत्र, कृषी संशोधन आदी क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी भारत आणि घाना यांच्यात काल दोन सामंजस्य करार करण्यात आले. परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी घानाचे परराष्ट्र मंत्री सॅम ओकुद्झेटो अब्लाक्वा यांच्याशी काल भारत आणि घानामधील सर्वसमावेशक भागीदारी अधिक दृढ करण्याबाबत चर्चा केली, त्यानंतर या करारांची देवाणघेवाण झाली. तत्पूर्वी, डॉ. जयशंकर यांनी घानाचे राष्ट्राध्यक्ष जॉन ड्रामानी महामा यांची भेट घेतली. डॉ. एस. जयशंकर सध्या घाना, कोत द' आयव्हरी आणि इथिओपिया या 3 देशांच्या दौऱ्यावर असून, या देशांशी द्विपक्षीय संबंध आणि सहकार्याचा आढावा घेण्यासाठी आणि ते अधिक दृढ करण्यासाठी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<u>रोजगार हमी अभियान</u>**

ग्रामीण भागासाठीच्या 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान' कायदा, 2025 अंतर्गत सरकारनं मान्य कामांची यादी अधिसूचित केली आहे. या नव्या ग्रामीण कार्य आराखड्यात 375 प्रकारच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. पूर्वीच्या आराखड्यातील 266 कामांच्या तुलनेत नव्यायादीमध्ये कामांच्या व्याप्तीत 41 टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी ग्रामीण माहिती विकास मंत्रालयानं दिली आहे. जलसुरक्षा, ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा, उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा तसंच हवामान बदल आणि आपत्ती सज्जतेसाठी विशेष कामं अशा चार मुख्य स्तंभांवर आधारित या कामांची पुनर्रचना करण्यात आली आहेत. प्रत्येक कामाची सुरुवात 'विकसित ग्रामपंचायत योजने'अंतर्गत तळागाळातील विकेंद्रित नियोजन प्रक्रियेद्वारे होईल आणि तिला ग्रामसभेची मंजुरी आवश्यक असेल; तसेच या कामांचा मागोवा 'विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा प्रणाली'द्वारे घेतला जाईल. या नव्या आराखड्यामुळं 'विकसित भारत 2047 च्या संकल्पनेला बळ मिळेल, असं ग्रामीण विकास मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>वायुसेना प्रमुख-नियुक्ती</u>**

हवाई दल प्रमुख म्हणून एअर मार्शल आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांच्याकडून ते 31 तारखेला ते पदभार स्वीकारतील. दीक्षित यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केलं आहे.

**जम्मू काश्मीर**

जम्मू काश्मीरमधील लष्करी सज्जतेचा आढावा घेण्यासाठी, उत्तर कमांडचे लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी कलाकोट आणि राजौरी या परिसराला काल भेट दिली. नियंत्रण रेषा आणि अंतर्गत भागात सुरक्षा बळकट करण्याबाबतची दक्षता, प्रशिक्षण, समन्वय आणि नाविन्यपूर्ण आदींविषयी शर्मा यांनी माहिती घेतली, असं लष्कराच्या वतीनं समाजमाध्यमावर देण्यात आलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**गोवा विधानसभा**

प्रत्येक आवाज ऐकला जाणंहे लोकशाही अधिक बळकट होत असल्याचं चिन्ह आहे, असं प्रतिपादन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल केलं. गोव्यात पर्वरीम इथं आयोजित गोवा विधानसभा संकुलाच्या रौप्य महोत्सवी सोहळ्यात ते बोलत होते. दीर्घकालीन संघर्षानंतर गोव्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. तेव्हापासूनच या राज्यानं देशाच्या विकासासमवेत आपला वारसा आणि नैसर्गिक पर्यावरणाचं संरक्षण करण्याचं महत्त्वाचे काम केले आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**मंधाना-महिला क्रिकेट**

भारतीय महिला क्रिकेट संघाच्याकर्णधारपदीस्मृती मंधानाची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळानंकाल हा निर्णय जाहीर केला. हरमनप्रीत कौरने तिन्ही प्रकारांतील कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय घेतल्यानंतर मंधानाची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय संघ आता एका नवीन टप्प्यावर असून अलीकडच्या काळात साधलेल्या प्रगतीला पुढे नेण्याच्या दृष्टीने पावले टाकत आहे; अशा वेळी मंधानामर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील पूर्णवेळ कर्णधार म्हणून जबाबदारी स्वीकारेल, असं क्रिकेट मंडळानं म्हटलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्टइंडिज यांच्यातल्या वीस षटकांच्या पाच सामन्यांच्या मालिकेत काल लखनौ इथंपहिल्या सामन्यात भारतानं वेस्टइंडिजचा आठ गडी राखून पराभव केला.प्रथम फलंदाजी करताना वेस्टइंडिजचा संघ 171 धावांवर सर्वबाद झाला. भारताचा कर्णधार श्रेयस अय्यरनं 43 चेंडूंत नाबाद 102 धावांची वादळी खेळी करत, टी-20 मधील आपलं पहिलं शतक झळकवलं. या मालिकेतला दुसरा सामना शुक्रवारी रांची इथं होणार आहे.

दरम्यान, न्यूझीलंडच्या आगामी दौऱ्यासाठी पाच टी-20 सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला आहे.वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारनं चार वर्षांनंतर संघात पुनरागमन केलं आहे, तर जसप्रीत बुमराह आणि फिरकी गोलंदाज रवी बिश्नोई यांना संघातून वगळण्यात आलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**